'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित'

# विवेकानंद कॉलेज (स्वायत्त)

## कोल्हापूर

## – समाजशास्त्र विभाग –

पेपर कमांक – सामाजिक मानसशास्त्र १६

विषयाचे नांव – महाराष्ट्रातील भील्ल जमातीचा अभ्यास

वर्ग :– बी.ए.भाग – ३ सत्र – ६

– मार्गदर्शक –

प्रा.विकास मस्के

| अ.न. | विद्यार्थ्याचे नांव | रोल नं. | सही | गुण |
|---|---|---|---|---|
| ०१ | ऐश्वर्या अनिल मोहिते | ५७१६ | | 09 |
| ०२ | प्रिया नेताजी माने | ५७१५ | | 10 |
| ०३ | सौरभ विजय मोहिते | ५७१७ | | 09 |
| ०४ | स्नेहल राजेंद्र बुरसे | ५६९० | | 10 |
| ०५ | श्रावणी सुरज नाईक | ५७१९ | | 09 |
| ०६ | सकलेन झाकीर देसाई | ५६९३ | | 10 |

शैक्षणिक वर्ष

२०२०-२०२१

# प्रतिज्ञापत्र

आम्ही सादर केलेला प्रकल्प हा स्वतः अभ्यासला असून यातील माहीती ही सत्य आहे. आम्हाला मिळालेल्या माहीतीतून **भिल्ल समाजाचा अभ्यास** करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. तसेच कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेवून सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर

दि.

**विवेकानंद कॉलेज (स्वायत्त)**

**कोल्हापूर.**

**मार्गदर्शक व समाजशास्त्र विभाग प्रमुख**

**प्रा. एच. व्ही. चामे**

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

Scanned with OKEN Scanner

# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रकल्प अहवाल निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी उपयुक्त ठरलेले आमचे प्रकल्प मार्गदर्शक **प्रा. विकास मस्के व समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे** तसेच महाविद्यालयाचे **प्राचार्य आर. आर. कुंभार** यांच्या बहुमुल्य मार्गदर्शनाशिवाय हा प्रकल्प पुर्णत्वास जाऊ शकला नसता. या प्रकल्प कार्यासाठी मला माझ्या प्रकल्प गटातील विद्यार्थ्यांनी खूप मदत केली त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानते.

**त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार ...**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

Page No. :
Date : / /


| अ. क्र. | घटकाचे नाव | Page No. |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 1 |
| 2 | उद्दिष्टे / हेतू | 2 |
| 3 | वापरलेली पद्धत | 3 |
| 4 | तथ्य संकलन / अहवाल | 4 - 8 |
| 5 | निष्कर्ष | 9 |
| 6 | संदर्भग्रंथसूची | 10 |



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# प्रस्तावना

समाजशास्त्रामध्ये अनेक शाखा आहेत त्यातीलच एक सामाजिक मानवशास्त्र हा स्पेशल पेपर अभ्यासाला आहे. या पेपरमध्ये आपल्याला प्रामुख्याने सामाजिक मानवशास्त्र, भारतातील आदिवासी समुदाय, आदिवासींचे सामाजिक जीवन, आदिवासींचा धर्म इ. इ. प्रकरणांचा अभ्यास समावेश केला आहे. तसेच आदिवासींची अर्थव्यवस्था, आदिवासी समस्या, आदिवासी विकास आणि महाराष्ट्रातील आदिवासी समुदाय ; भिल्ल या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

'सातपुडा प्रदेश' हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. गुजरात आणि मध्य प्रदेशातील पर्वताच्या रांगा महाराष्ट्रात अमरावती, धुळे, जळगाव आणि औरंगाबाद या जिल्ह्यात पसरलेल्या आहेत. सातपुडा पर्वत रांगांमधील तापी व नर्मदा नद्यांच्या मधील पहाडी प्रदेश व आजूबाजूला सखल व पर्वतमय प्रदेश 'भिलवाड' या नावाने ओळखला जात होता.

भिल्ल हि महाराष्ट्रातील ऐतिहासिक महत्त्वाची व संख्येने एक प्रमुख आदिवासी जमात आहे. गडद तपकिरी वर्ण, गोलगरगरीत चेहरा, रुंद व भलामोठा जबडा आणि सुदृढ कमावलेले शरीर हि यांची वैशिष्ट्ये आहेत.

आर्थिकदृष्ट्या भिल्ल ही स्थायिक शेतकऱ्यांची जमात आहे. परंपरेने हि निष्णात तीरंदाजांची जमात आहे.

सामाजिक मानवशास्त्र या स्पेशल पेपर मध्ये 'महाराष्ट्रातील आदिवासी जमात : भिल्ल' या प्रकल्पाचा इंटरनेट व पुस्तकीय माहिती वाचून सादर करण्यात आला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

Scanned with OKEN Scanner

## हेतू / उद्दिष्टे

Page No. :
Date : / /

हा प्रकल्प करण्यासाठी मी काही हेतू / उद्दिष्टे ठरवलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे

1) महाराष्ट्रातील भिल्ल जमातीचे स्थान / प्रदेश

2) भिल्ल जमातीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेणे.

3) भिल्ल जमातीचे धार्मिक जीवन अभ्यासणे.

4) भिल्ल जमातीच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे.

5) भिल्ल जमातीमध्ये आलेले परिवर्तनाचा अभ्यास करणे.

अशी मी हे उद्दिष्टे ठरवून प्रकल्प कार्य पूर्ण करणार आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

# वापरलेली पद्धत

Page No. :
Date : / /

मी या प्रकल्पासाठी एक पद्धतीचा वापर केला आहे. त्यातील एक दुय्यम स्रोत याचा वापर केला.

दुय्यम स्रोत मध्ये मी इंटरनेट वरून काही माहिती मिळवली तसेच पुस्तकाचा वापर केला.

अशाप्रकारे मी प्रकल्पकार्य पूर्ण करण्यासाठी या एक पद्धतीचा वापर केला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

# तथ्य संकलन / अहवाल

Page No. :
Date : / /


## 1) महाराष्ट्रातील भिल्ल जमातीचे स्थान / प्रदेश

'सातपुड्यातील प्रदेश' हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. सातपुडा पर्वताच्या रांगामध्ये हा प्रदेश विखुरलेला आहे. गुजरात आणि मध्य प्रदेशातील पर्वतरांगांचा भाग सोडला तर सातपुडा पर्वतांच्या रांगा महाराष्ट्रात अमरावती, धुळे, जळगाव आणि औरंगाबाद या जिल्ह्यात पसरलेल्या आहेत. सातपुडा पर्वत रांगांमधील तापी व नर्मदा नद्यांच्या मधील पहाडी प्रदेश व आजूबाजूचा सखल व पर्वतमय प्रदेश 'भिलवाड' या नावाने ओळखला जात होता.

भिल्ल ही महाराष्ट्रातील ऐतिहासिक महत्त्वाची व संख्येने एक प्रमुख आदिवासी जमात आहे. भारतातील प्राचीन शिलालेखांत आणि प्राचीन साहित्यात भिल्लांचे उल्लेख सापडतात. इतकी हि पुरातन जमात आहे.

धुळे जिल्ह्यात भिल्ल जमातीच्या अनेक शाखा आहेत. त्यात बरडे भिल्ल, मावची भिल्ल, वसावे, पाडवी, पावरा, तडवी, धानका, लाडया भिल्ल, मथवाडी भिल्ल, बोंडेगवाल भिल्ल, कोटले भिल्ल, ढेड (धेड) भिल्ल, नाईक भिल्ल, गामित, मेवाशी भिल्ल, आदींचा समावेश होतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



पुरुष पोशाख



स्त्री पोशाख

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

Scanned with OKEN Scanner

२) भिल्ल जमातीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेणे.

धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल आदिवासीत ५० वर्षात कार भिल्ल हे दणकट बांध्याचे लांब नाकाचे, आणि आकर्षक चेहऱ्याचे असतात. पुरुषांचा पारंपारिक पोशाख लंगोटी, बंडी इ.

भिल्ल ही महाराष्ट्रातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आणि संख्येने एक प्रमुख जनजाती आहे. भारतातील प्राचीन शिलालेखात आणि प्राचीन वाङ्मयात भिल्लांचे उल्लेख सापडतात. म्हणजेच भिल्ल ही जमात असता प्राचीन जमात आहे. प्रभु रामचंद्र जेव्हा दंडकारण्यात आले तेव्हा त्यांनी शबरी नावाची भिल्लीन भेटली. असा उल्लेख पुराणकथांमध्ये सापडतो. त्याकाळी या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना 'शबर' 'किरात' 'निषाद' या नावाने ओळखले जाई. हे लोक दुसरे तिसरे कोणी नसून सातपुड्यातील भिल्लच होत. त्यांच्या पूर्वजांच्या संदर्भात एक अशी पारंपारिक श्रद्धा आहे की महादेवाने जिचे प्रियाराधन केले अशा एक भिल स्त्रीपासून भिल्लांची वंशावळ सुरु केली.

साक्री व नवापूर तालुक्यात हा समाज प्रामुख्याने राहणे. गावीत म्हणजे गावचे हे स्वतः ला भिल्लांचे वंशज मानतात. गावित माळची, पडवी, वसावा ही यांची आडनावे आहेत. मुख्यतः खानदेश भागात त्यांची वस्ती मोठ्या प्रमाणावर आढळून येते.

तसेच भिल्लांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये परिवर्तन ही झाले आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

Scanned with OKEN Scanner

Page No. :
Date : / /



भिल्ल आदिवासी स्त्रिया



रिम देवाचा सण

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Page No. :
Date : / /

3) भिल्ल जमातीचे धार्मिक जीवन अभ्यासणे.

दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या व अज्ञानात रुतलेल्या भिल्लांच्या देवधर्माबद्दलच्या कल्पना त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाला पोषक अशाच आहेत. वाघदेव, धानदेव, सर्पदेव, म्हसोबा, वेताळ, डोंगरदेव, हे भिल्लांचे देव आहेत. तसेच इतर आदिवासीप्रमाणेच भिल्लसुद्धा निसर्गाचे उपासक आहेत. वनस्पती, प्राणी, देवाच्या अद्‌भूत शक्तीचे ते पूजा करतात याशिवाय गाय, बैल, घोडा यांना समाजात महत्त्वाचे स्थान आहे. साप, वाघाची पुजा करतात. आंबा, पिंपळ, केळी यांना पवित्र झाडे मानली जातात. भिल्लांमध्ये स्वर्ग-नरक कल्पना नाही. परंतु ते आत्मा मानतात आणि त्यांचा पुनर्जन्मावरही विश्वास आहे भुतेखेते यावरही त्यांचा विश्वास आहे.

सातपुड्यातील भिल्लांच्या वाघदेव, शीमदेव, नंदुरदेव, पालुडा देव, खेतरड्या देव, बडादेव, याहामोगी, इ. देवदेवतांचा पुजा करतात. प्रत्येक देवीची विशिष्ट कामासाठी पुजा केली जाते पावसाळ्यात वाघ देवाचा सण साजरा केला जातो. या देवाला कोंबडी कापली जाते व पालेभाजीचा नैवेद्य दाखवला जातो, त्यानंतरच भिल्ल रानातील पालेभाज्या खाण्यास सुरुवात करतात.

शीम देवाचा सण शिवरात्रीला साजरा केला जातो शिवाय पाऊस पडून गवत वर आले तर गवत काढावयास प्रारंभ करावयाच्या आधी नंदुरा देवीची पूजा केली जाते.

भिल्लांच्या धार्मिक जीवनामध्ये फारसे परिवर्तन झाल्याचे आढळत नाही. अद्यापही धर्माशी संबंधित सर्व परंपरांचे पालन ते करतात.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

Page No. :
Date : / /

1) भिल्ल जमातीच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे.

आर्थिकदृष्ट्या भिल्ल ही स्थानिक शेतकऱ्यांची जमात आहे. परंपरेने ही निरक्षर अशी तिरंदाजांची जमात मानली जाते. विल्सन यांच्या म्हणण्याप्रमाणे, 'भिल्ल' ही संज्ञा 'बिल्लू', धनुष्य' या द्रविड शब्दापासून झाली आहे. आणि तेच या लोकांचे परंपरागत आयुध आहे. त्यांना आयुधाचा वापर ते शिकारीसाठी करतात. पूर्वी भिल्ल ही शिकारी जमात होती, परंतु जसा जसा काळ गेला त्याप्रमाणे त्यांच्या मुख्य व्यवसाय शेती झाला. यांच्याकडे स्वतःच्या जमिनी नाहीत ते लोक दुसऱ्यांच्या शेतात शेतधारीने काम करतात.

सुरुवातीला भिल्लांना जनावरांचे दूध काढण्याची कल्पना मानवत नसे. परंतु आजकाल त्यांच्यापैकी कित्येक जण दुधाचा अन्न म्हणून उपयोग करतात आणि त्यापासून तूप तयार करून ते बाहेरील लोकांना विकतात. तसेच गोमांस भक्षण परंपरेने निषिद्ध ठरवले आहे. बहुतांश भिल्ल हे मजुरी करतात. तसेच काहीजण जंगली माल गोळा करून त्याची विक्री करतात शिकारी बरोबर मासे पकडतात. महुआच्या सुकवलेल्या फळांपासून तेल काढण्याचेही कसब त्यांना अवगत आहे.

तसेच सध्या आदिवासी शेतकऱ्यांकरिता सामुदायिक शेताना दिसत आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

5) भिल्ल जमातीमध्ये आलेले परिवर्तनाचा अभ्यास करणे.

भिल्ल जमातीमध्ये शैक्षणिक परिवर्तन घडून आणण्याचे काम 60-70 वर्षापूर्वी समाजसेवकांनी केलेले आहे. पू. श्री ठक्करबाप्पांच्या आशिर्वादाने पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळ नंदुरबार ही संस्था सुरू झाली. तसेच शिक्षणाच्या दृष्टीने आदिवासी भागात शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्यामार्फत धुळे, नंदुरबार जिल्ह्यात 250 आश्रमशाळांमधून 60-70 हजार मुले शिक्षण घेत आहेत. तसेच दिवसेंदिवस तरुण उमेदवार स्पर्धात्मक परिक्षेत सुयश संपादन करत आहेत. राजकीय जागृतीही मोठ्या प्रमाणात झाली. हे काही शहरी लोकांना शिवाय आदिवासी भिल्ल आता शहरवासियांच्या बरोबरीने प्रगती करू लागलेला आहे. तसे ते भिल्लांच्या धार्मिक जीवनामध्ये फारसे परिवर्तन झाल्याचे आढळत नाही. अद्यापही धर्माशी संबंधित सर्व परंपरांचे पालन ते करतात.

आज भिल्ल समाजावर आधुनिकता आणि शिक्षण यांच्या प्रभाव पडला असून त्यांनी तो मान्यसुद्धा केला आहे. पण सांस्कृतिकदृष्ट्या ते अजूनही पारंपारिक आहेत. आणि हीच त्यांची ओळख आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

Page No. :
Date : / /

# निष्कर्ष

सातपुडा हा प्रदेश प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो भिल्लांमध्ये वळवी वसावे, तडवी, बरडे, गावीत मावची, नाईक, धनका असे अनेक प्रकार आढळतात. त्याच्या प्रत्येकाच्या विवाहाच्या प्रथा मनोरंजक असल्याचे दिसून येते. भिल्ल ही पूर्वी शिकारी जमात होती. परंतु जसा-जसा काळ गेला, त्याप्रमाणे त्यांचा मुख्य व्यवसाय शेती झाला शेती ज्यांच्याकडे नाही ते लोक मजुरी करतात.

इतर काही आदिवासी जमातीप्रमाणे भिल्लसुध्दा निसर्गाचे उपासक आहेत. वनस्पती, प्राणी आणि देवाच्या अद्भूत शक्तीची ते पुजा करतात. हिंदू देवीदेवतांप्रमाणेच ते मुस्लिम पीरांनासुध्दा महत्त्व देतात.

होळी, दिवाळी हे दोन सण मोठ्या भक्तीभावाने साजरे केले जातात. भिल्लांमध्ये स्वतःचा जोडीदार स्वतः निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. विविध अलंकाराचे शौकीन असल्याचे दिसून येते.

आज भिल्ल समाजावर आधुनिकता आणि शिक्षण याचा प्रभाव पडला असून त्यांनी तो मान्यसुध्दा केला आहे. पण सांस्कृतिकदृष्ट्या ते अजूनही पारंपारिक आहेत आणि तीच त्यांची ओळख आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

# संदर्भग्रंथसूची

Page No. :
Date : / /

ग्रंथ :- सामाजिक मानवशास्त्र

प्रकाशक :- डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ
कोल्हापूर - 416004.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)
ESTD JUNE 1964

# प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, समाजशास्त्र या विषयाच्या संशोधनात्मक प्रकल्पासाठी सादर केलेला प्रकल्प अहवाल **महाराष्ट्रातील भिल्ल जमातींचा अभ्यास** हा प्रकल्प आमच्या पर्यवेक्षक व मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

स्थळ : कोल्हापूर

दि.

**विवेकानंद कॉलेज (स्वायत्त)**

**कोल्हापूर.**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

**समाजशास्त्र प्रमुख**

**प्रा. एच. व्ही. चामे**

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner